अहिल्यानगर महानगरपालिका
पाणी पुरवठा विभाग
वेबसाईट : www.amc.gov.in
ई-मेल : amc_anr@rediffmail.com

जा.नं. शहर पा.पु.399

दिनांक :- १३/०६/२०२५

प्रति,
मा. प्रसिध्दी विभाग प्रमुख,
अहिल्यानगर महानगरपालिका.

विषय- वादळी वा-यासह पाउस होत असल्याने व त्यामुळे अहिल्यानगर शहर पाणी पुरवठा योजनेवरील विदयुत पुरवठा खंडीत होत असल्याने पाणी वितरणात अडथळे निर्माण होत असल्याने नागरिकांनी दक्षता घेवून सहकार्य करणे बाबत

महोदय,

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेच्या मुळानगर, विळद पंपींग स्टेशन परिसरात व शहर पाणी वितरण व्यवस्थेतील मुख्य केंद्र वसंत टेकडी परिसरात वादळी वा-यासह पाउस होत आहे. व त्यामुळे वारंवार वीज पुरवठा देखील खंडीत होत आहे.

वीज मंडळाकडून होणारा वीज पुरवठा नैसर्गीक आपत्ती व तांत्रिक अडचणीमुळे बिघाड निर्माण होवून वीज पुरवठा अर्धा-एक तास जरी खंडीत झाला तरी मुळानगर, विळद व नागापूर येथील कार्यरत पंपीग स्टेशन येथून पाणी उपसा सुरळीत होण्यास सुमारे दोन ते तीन तासाचा अवधी लागतो. त्यामुळे अनियमीत पाणी उपसा होवून शहरातील वितरणासाठीच्या टाक्या निर्धारीत वेळेत भरणे शक्य होत नाही. पर्यायाने शहराच्या मध्यवर्ती भागासह सर्व उपनगर भागास नियमीत व पूर्ण दाबाने पाणी पुरवठा करण्यास अडचणी निर्माण होत आहेत.

आजवरचा अनुभव पाहता मान्सुन काळात वादळी वा-यामुळे शहर पाणी पुरवठा योजने करीता विदयूत वितरण कंपनीकडून होणारा वीज पुरवठा खंडीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी सध्याची मान्सून परिस्थितीत वादळी वा-यासह पाउस होत असल्याने अचानक वीज पुरवठा खंडीत होत आहे. व खंडीत वीज पुरवठया मुळे नियमित पाणी उपसा होणेस नैसर्गिक व तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने नागरिकांनी पाण्याचा योग्य साठा करून, पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

अशी बातमी सर्व स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करावी.

जल अभियंता
अहिल्यानगर महानगरपालिका

प्रत : मा.आयुक्त तथा प्रशासक, अहिल्यानगर महानगरपालिका यांचे माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा उपायुक्त (कर), अहिल्यानगर महानगरपालिका यांचे माहितीस्तव सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner